वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## नितेश राणेंची मुस्लिम विरोधी भुमिका सुरूच



# आता तर मुस्लिम मुलींना दहावी बारावीच्या परिक्षेत बुरखा घालून प्रवेश न देण्याची मागणी

### राज्य सरकारने नितेश राणेंना आवरणे गरजेचे

### वारंवार मुस्लिम विरोधी वक्तव्य करून राज्यात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

मुंबई, (दिव्य न्युज):- हिंदुत्वावर सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी मुस्लिम विद्यार्थिनींसंदर्भात एक नवा वाद सुरू केला आहे. बुरखा घालून दहावी आणि बारावीच्या परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देऊ ▶▶ पान २ वर

Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## बीडमध्ये एसपींची मोठी कारवाई

# वाळू माफीयांना मदत करणाऱ्या पोलिसांना निलंबित केलं

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड पोलीस चांगलेच चर्चेत आले आहेत. नवे पोलीस अधिक्षक नवनीत कावंत यांनी सुत्रे हाती घेताच नवीन बदल केले आहेत. आता अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात त्यांनी मोठी कारवाई केली आहे. आता वाळू माफियांना मदत करणाऱ्या पोलिसांवर त्यांनी कारवाई केली आहे. अवैध वाळू उपसा



केल्या प्रकरणात आरोपींसोबत साटे लोटे करणाऱ्या बीडच्या गेवराई पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कावंत यांनी ही कारवाई केली आहे. गेवराई येथील पोलीस ठाण्यातील सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलीस हवालदार अशोक हंबर्डे यांच्यावर कारवाई केली आहे.

मिळालेली माहिती अशी,सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलीस हवालदार अशोक हंबर्डे या दोघांनी वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर ▶▶ पान २ वर

# धनंजय मुंडेंची टोळी सोडली, तर कोणीही समर्थन करणार नाही

### नामदेव शास्त्रींच्या भूमिकेवर मनोज जरांगेंचं भाष्य

बीड, (दिव्य न्युज):- धनंजय मुंडे यांच्या भेटीनंतर भूमिका मांडताना महंत नामदेव शास्त्री यांनी त्यांची पाठराखण केली. भगवान गड भक्कमपणे त्यांच्या पाठीशी आहे, असे नामदेव शास्त्री म्हणाले. त्यांच्या या भूमिकेवर आता मनोज जरांगे पाटील यांनी भाष्य केले आहे. त्यांच्याकडे जाणाऱ्यानेच त्यांना शिकवलं असेल. त्यांना दोष देता येणार नाही, अशी भूमिका जरांगेंनी मांडली आहे.



धनंजय मुंडे यांनी गुरुवारी भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांची भेट घेतली. या भेटीनंतर धनंजय मुंडे हे खंडणी घेणारे नेते नाहीत, असे म्हणत आपण त्यांच्या भक्कमपणे पाठिशी आहे, असे नामदेव शास्त्री म्हणाले.

छत्रपती संभाजीनगरमध्ये माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, मी महंतांवर बोलू शकत नाही. ते कुणाला भीत नाहीत, पण त्यांना कुणी एकच बाजू सांगितली असेल; ते बोललेही असतील. एक संस्कारी पिढी घडवणारे ▶▶ पान २ वर

### मरण समोर दिसल्यावर...

खून, चोरी, छेडछाडी करणाऱ्यांबद्दल ते असं बोलतील असं वाटत नाही. त्यांना (नामदेव शास्त्री) दोष देता येणार नाही. कारण जो गेलाय, त्याला कुठे-कुठे हात पसरावे हेच कळेना. मरण पुढे दिसल्यानंतर असंच होते, अशी टीका धनंजय मुंडे यांच्यावर मनोज जरांगे पाटील यांनी केली.

# आ.संदीप क्षीरसागरांकडून डीपीडीसी बैठकीत केले महत्वाचे लोकप्रश्न उपस्थित

### मतदारसंघातील विविध कामांसाठी केली विशेष अतिरिक्त निधीची मागणी



बीड , (दिव्य न्युज):- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी (दि.३०) रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील लोकांच्या आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले लोकप्रश्न मांडले. तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष अतिरिक्त निधीची मागणीही आ.क्षीरसागर यांनी यावेळी केली.

गुरुवारी (दि.३०) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची, पहिली बैठक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघाच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न मांडले.

आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या मागण्या

बीडच्या पंचायत समिती आवारामध्ये स्व.आण्णासाहेब पाटील व स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांचा पुतळा बसविणे. - ३० खाटाचे आयुष रूग्णालय छळक्वअंतर्गत २०१९ ला बीडसाठी मंजुर आहे. त्यासाठी शासकीय जमीन बीड शहरातील इमामपुर रोडवरील गट नं.३४-३५ व पारगाव जप्ती या शिवारात उपलब्ध आहे.यासाठी कार्यवाही व्हावी.- नगर परिषदेकडे महावितरणची ३६ कोटी जास्त रूपयांची थकबाकी आहे. त्या संदर्भात जनहित याचिका देखील दाखल आहे. नगरपरिषदेच्या सोलार प्रकल्पाची विद्युत निर्मिती होते ती विद्युत ▶▶ पान २ वर

### ५३ दिवसांपासून मीडिया ट्रायलने मला टार्गेट केलं

# माझ्यावर आलेलं संकट आजचं नाही ५३ दिवसापासून संकट कायम-धनंजय मुंडे

बीड, (दिव्य न्युज):- मीडिया ट्रायलसाठी मला मागील ५३ दिवसांपासून सातत्याने टार्गेट केलं जात आहे. मागच्या या दिवसांत मी एकही शब्द मीडियामध्ये त्याप्रकारे बोललो नाही. त्यामुळे संकट ५३ दिवसांचं होतं, असं वक्तव्य मंत्री धनंजय मुंडे यांनी केलं. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी भगवानगडावर दर्शन घेतलं. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना संपूर्ण बीड प्रकरणावर आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणावर भाष्य केलं.

माझ्यावरचं संकट आज आलेलं नाही. मागील ५३ दिवसांपासून माझ्यावर संकट कायम आहे. आज ५३ वा दिवस आहे. मीडिया ट्रायलसाठी मला मागील ५३ दिवसांपासून सातत्याने टार्गेट केलं जात आहे. आणि मागच्या या दिवसांत मी एकही शब्द बोललो नाही. त्यामुळे संकट ५३ दिवसांचं होतं. त्यामुळे या संकटातून बाहेर येण्यासाठी मी या भगवान गडावर येऊ शकलो असतो. पण मी आज त्या भावनेनं न येता मंत्री झालो आहे, त्या भावनेनं दर्शन घेण्यासाठी आलो आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.



स्वर्गीय सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. या हत्येत जे कोणी आरोपी असतील, त्यांना फासावर लटकवलं पाहिजे. संतोष देशमुख यांची केस फास्ट ट्रॅकवर आणली पाहिजे. यामध्ये कोणीही असो, कोणालाच सोडून नये त्याला शासन झालंच पाहिजे, ही पहिल्या दिवसापासून माझी भूमिका आहे. आता ही भूमिका मी स्वत:हून मांडल्यानंतरही काही जण राजकारण करत असतील. त्यात माझा राजीनामा घेण्याची मागणी करत असतील. तसेच ज्यांन कोणी संतोष देशमुखांची हत्या केली त्याला फासावर लटकवणं महत्त्वाचं आहे. अशात माझा राजीनामा घेऊन ▶▶ पान २ वर

# पुण्यात का वाढताय जीबीएस मृत्यू

## जीबीएसचा राज्यातील इतर भागातही प्रसार

पुणे, (दिव्य न्युज):- पुणे जिल्ह्यातील जीबीएसने चिंता वाढवली आहे. पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) झालेल्या तिसऱ्या रुग्णाचा मृत्यू झाला आहे. राज्यातील चौथ्या रुग्णाचा मृत्यू आहे. पुण्यानंतर आता राज्यातील इतरही जिल्ह्यात जीबीएसचे रुग्ण आढळून येत असल्याने आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली आहे. पुण्यातील नांदेड परिसरातील ६० वर्षीय ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला आहे.

पुण्यातील नांदेड परिसरात अनेक रुग्ण हे जीबीएस बाधित आहेत. त्यातील एकाचा मृत्यू झाला आहे. पुण्यात जीबीएस बाधित हा तिसरा रुग्ण आहे. त्यांना रक्तदाबाचा त्रास होता. त्यामुळे काही दिवस पुण्यातील खासगी रुण्यालयात उचार सुरु होते. त्यांची प्रकृती अधिक बिघडल्यानंतर कुटुंबाने त्या महिलेला ससून रुग्णालयात दाखल केले होत. ससून रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

पुण्यात जीबीएसची प्रकरणे का वाढली त्यासंदर्भात कन्सल्टंट- ▶▶ पान २ वर

# वक्फ विधेयकामधील बदलांना संसदीय समितीकडून मिळाली मंजुरी

### वक्फ संपत्ती व्यवस्थापनात आधुनिकता आणण्याचा प्रयत्न

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- संसदीय समितीने बुधवारी वक्फ (दुरुस्ती) विधेयकातील नव्या बदलांना बहुमताने मंजुरी दिली. या निर्णयाच्या समर्थनार्थ १५ आणि विरोधात ११ मते पडली. या अहवालात भाजप सदस्यांनी सुचवलेले बदल समाविष्ट केले आहेत. जेपीसीच्या या निर्णयामुळे वक्फ बोर्डांना संपवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करून विरोधकांनी याला विरोध दर्शवला आहे. दुसरीकडे, भाजप सदस्यांनी सांगितले की, हे विधेयक वक्फ संपत्तीच्या व्यवस्थापनात आधुनिकता, पारदर्शकता आणि जबाबदारी आणण्याचा प्रयत्न आहे.हा अहवाल गुरुवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासमोर सादर केला जाईल. शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तो दोन्ही सभागृहांत मांडला जाईल, असे भाजप खासदार आणि समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी सांगितले.

द्रमुक खासदार ए. राजा म्हणाले की, 'वक्फ बाय ▶▶ पान २ वर

### हे बदल वक्फ बोर्ड संपवतील : खासदार ओवेसी

विरोधकांची मुख्य चिंता वक्फ बोर्डात गैर-मुस्लिमांची नियुक्ती होती. हा संविधानाच्या परिशिष्ट २६ चे उल्लंघन असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. याशिवाय 'वक्फ बाय युजर' तरतूद काढून टाकण्याच्या प्रस्तावाचा विरोध केला.



एमआयएम नेते असदुद्दीन ओवेसी म्हणाले, हे बदल वक्फ बोर्ड संपवतील आणि केंद्र सरकारचा हस्तक्षेप वाढवतील.

# भगवानगडासारख्या पवित्र ठिकाणावरून गुन्हेगारी वृत्तीचे समर्थनकरणे हे समाजासाठी घातक

### धनंजय मुंडे यांच्या हाताला लावलेल्या सलाईनपेक्षा वाल्मिक कराडने अनाथ केलेले लेकरांचे दु:ख मोठे-आ.जितेंद्र आव्हाड

**मुंबई, (दिव्य न्युज):-धनंजय मुंडेच्या हाताला लावलेल्या सलाईन पेक्षा धनंजय मुंडे, वाल्मिक कराड यांच्यामुळे अनाथ झालेली लेकरे, विधवा झालेल्या बायका, आपल्या पोटच्या मुलांना गमावून सतत डोळ्यातून आसवे गाळणारे आई-बाप, यांनी घडवून आणलेल्या हल्ल्याने कायम अधु झालेले लोक, यांनी खोट्या गुन्ह्यांत अडकवल्यानंतर तुरूंगात खितपत पडलेले किंवा रानोमाळ भटकंती करणारे लोक यांचे दु:ख फार मोठे आहे. महंत म्हणून आपण हे दु:ख समजावूण घेणार आहात का?सुदर्शन घुले, प्रतीक घुले, गोट्या गित्ते , धनराज फड, सुनिल फड, विष्णु चाटे, रघु फड, यांसारखे समाजातील शेकडो तरुण स्वत: च्या राजकीय फायद्यासाठी गुन्हेगार बनवलेत. त्यांच्या कुटुंबाची काय अवस्था आहे?.**

बीडमधील मस्साजोग गावचे सरपच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण गेल्या काही दिवासंपासून चांगलेच चर्चेत आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर देखील आरोप केले जात आहेत. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप करत त्यांचा राजीनामा घेतला जावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. ▶▶ पान २ वर

# पैशांचा पाऊस पाडणारा जेलमध्ये

## गंडा,दोऱ्याचा खेळ करणारेही कोठडीत

बीड, (दिव्य न्युज):- पैशांचा पाऊस पाडतो, तुमच्या घरी चांगले दिवस येतील, असे वेगवेगळे आमिष दाखवून काही जण गंडा-दोऱ्याचा खेळ करतात; परंतु हे सर्व अंधश्रद्धा आहे. यावर कोणीही विश्वास ठेवू नये. पैशांचा पाऊस पाडतो म्हणणारेही जेलमध्ये गेले आहेत. त्यामुळे सर्वांनी सावध राहावे, कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे अवाहन प्रशासनाने केले आहे.जादूटोणा करणे हे कायद्याने गुन्हा आहे. असे असले तरी आजही अनेक ठिकाणी असे प्रकार होत आहेत. २०२४ या वर्षात अशा प्रकारचा एकच गुन्हा दाखल झालेला असला तरी त्याआगोदरच्या काळात असे अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून याबाबत अनेकदा जनजागृतीही केली जाते; परंतु तरीही काही लोक असे प्रकार करत असल्याचे वारंवार समोर येत आहे; परंतु असे करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना जेलची हवा देखील खावी लागली. त्यामुळे जादूटोण्यापासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, अशाप्रकारे कोणी जादूटोणा करीत असेल तर त्याची माहिती डायल ११२ वर पोलिसांना द्यावी, खात्री करुन कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



### गुप्तधनाचा विचार डोक्यातून जाईना

**गुप्तधन मिळणार असे सांगून काही जण फसवणूक करतात; परंतु असे विचार डोक्यातून काढून टाका. जादूटोण्याने असे काहीही होत नाही.**

### जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

जादूटोणा विरोधी कायद्याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होत आहे.तक्रारदार येताच कायद्यानुसार गुन्हा दाखल करून घेतला जातो.

### रुग्णालयापेक्षा भोंदूबाबावर भरवसा

एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर काही लोक आगोदर भोंदूबाबाकडे जातात. अनेकांचा आजही रुग्णालयापेक्षा भोंदूबाबावरच अधिक विश्वास असल्याचे दिसत आहे. जुन्या पिढीत हे प्रमाण अधिक आहे; परंतु नवीन पिढी आता याला विरोध करत आहे.



# परळी औष्णिक केंद्राच्या अधिकाऱ्यांनी केली गावकऱ्यांची दिशाभूल- ग्रामस्थ

## दाऊदपूरचा बेरोजगार आत्मदहन करणार तर ग्रामस्थांचे पुन्हा आमरण उपोषण

परळी, (दिव्य न्युज):- परळी तालुक्यातील दाऊदपूर येथील प्रदूषण बाधीत स्थानिक नागरीकांना शंभर टक्के कोटा ठरवून दिलेला बेसिक दर ७५ रूपये टन दराने पाऊंड अॅश (राख) उचलण्याची परवानगी मिळावी या मागणीसाठी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. तर दुसरीकडे स्थानिक लोकांना डावलून परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासनाने आपल्या आश्वासनावर खरे उतरले नाही. यामुळे प्रदुषण बाधीत गावातील शेकडो बेरोजगार झाले आहेत. त्यामुळे येत्या सहा फेब्रुवारी रोजी परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या युनिट ६/७समोर आत्मदहन करण्याचा इशारा राम सलगर यांनी दिला आहे. त्यामुळे परळीत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. त्यामुळेऔष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासनाने या गंभीर बाबीची नोंद घेऊन तात्काळ मागण्या मान्य कराव्यात असे निवेदन दिले आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या प्रशासनाला वेळोवेळी मौजे दाऊदपूर प्रक्षण बाधीत राख नियंत्रण कृती समितीने निवेदन देऊन सदरील पौंडश टेंडर प्रक्रिया रद्द करावी. शंभर टक्के कोटा ठरवून दिलेला बेसिक दर ७५ रूपये प्रमाणे पौंड अॅश उचलण्याची परवानगी द्यावी. २३ जानेवारी २०२५ रोजी काढण्यात आलेल्या जाहीर सूचना तात्काळ रद्द कराव्यात.

सुधारीत जाहीर सूचना फक्त राख प्रदुषण बाधीत दाऊदपूरासाठी निविदा काढावी. दाऊदपूर गावाच्या विकासासाठी सीएसआर निधी उपलब्ध करून द्यावा. नसता ४ फेब्रुवारी रोजी येथील ग्रामस्थ सामूहिक आमरण उपोषण करण्याचा इशारा देत असताना काल दाऊदपूर येथील बेरोजगार राम सलगर यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्र यांच्या अधिकाऱ्याने राख नियंत्रण कृती समितीची दिशाभूल केली आहे. प्रमुख

मागण्या मान्य करण्याचे आश्वासन या अगोदरच्या अधिकाऱ्याने दिले असताना अचानकपणे वेगळीच निविदा प्रक्रिया राबवून स्थानिक दाऊदपूर प्रदुषण बाधीत गावांना डावलण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे राम सलगर यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन ६ फेब्रुवारी २०२५ रोजी औष्णीक विद्युत केंद्र युनिट ६/७गेटसमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे परळीत पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. सदरील निविदा प्रक्रिया राबविताना नवीन आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कोणत्या नियमाचे कायद्याचे पालन केले याची चौकशी होणे गरजेचे असल्याची चर्चा या आंदोलनाच्या माध्यमातून होत आहे.

# पाच वर्षात विभागात परिक्षेत ४० टक्के कॉपी चालली

## जिल्ह्यात १० वीचे १५६ ते १२ वीचे १०६ परिक्षा केंद्र

बीड, (दिव्य न्युज):- दहावी आणि बारावीच्या येत्या काही दिवसामध्ये परिक्षा होत आहेत. परिक्षेमध्ये कॉपी रोखण्यासाठी दरवर्षी शिक्षण विभाग विविध उपाय योजना आखत असते. मात्र त्याला १०० टक्के यश येत नाही. गेल्या वर्षाचा आढावा घेतला तर छत्रपती संभाजीनगर विभागा अंतर्गत बारावीच्या परिक्षेत ४० टक्के तर दहावीच्या परिक्षेत २५ टक्के केंद्रावर गैर प्रकार आढळुन आले होते. ज्या ठिकाणी गैर प्रकार आढळुन आले या सर्व परिक्षा केंद्रावरील पर्यवेक्षण टिम रोटेशन करण्यात येणार आहे. जिल्ह्यात बारावीचे १०६ तर दहावीची १५६ परिक्षा केंद्र आहेत.

कॉपी मुक्त परिक्षा व्हावी यासाठी विविध उपाय योजना आखल्या जात असतात. कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई देखिल केली जाते. मात्र परिक्षेतील गैर प्रकार थांबता थांबत नाही. ग्रामीण भागातील परिक्षा केंद्रावर तर सर्रासपणे कॉप्या केल्या जात असतात. परिक्षा केंद्रभोवती विद्यार्थ्यांचे नातेवाईकही मोठ्या प्रमाणात जमतात व विविध मार्गाने आपल्या पाल्यांना कॉप्या पुरविण्याचे काम करत असतात. यावर्षी शिक्षण विभागाने ज्या परिक्षा केंद्रावर गेल्या पाच वर्षामध्ये गैर प्रकार झाल्याचे आढळुनआले आहे. त्यापरिक्षा केंद्रावर पर्यवेक्षण टिम रोटेशन करण्यात येणार आहे. गेल्या पाच वर्षात विभागामध्ये बारावीच्या ४० टक्के तर दहावीच्या २५ टक्के परिक्षा केंद्रावर गैर प्रकार झाल्याचे आढळुन आलेले आहे. बीड जिल्ह्यामध्ये दहावीचे १५६ परिक्षा केंद्र असुन यातील ५३ परिक्षा केंद्रावर गैर प्रकार झालेला होता. तर बारावीचे १०६ परिक्षा केंद्र आहेत त्यातील ५१ परिक्षा केंद्रावर गैर प्रकार झालेले आहेत. दरम्यान या वर्षीच्या परिक्षा कॉपी मुक्त व्हाव्या म्हणून शिक्षण विभागाने ठोस भुमिका घेतलेली आहे.

पान ४ वरून

## पत्रकार संघ आणि आश्रय

आयुष्यात अनंत कष्ट, यातना सोसल्या. भाजी विक्री पासून ते बीड शहरातील सफाई कामगारापर्यंत त्यांनी काम केले. कामामध्ये कधीही कुचराई केली नाही. कोणत्याही कामाची लज्जा कधी बाळगली नाही. ज्येष्ठ राजकारणी शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारांवर प्रेरित होऊन त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. मध्यंतरी पक्षांमध्ये फाटाफुटी झाली. फुटीरांनी अनेक आमिषे दाखवली. मात्र त्यांनी पक्षासोबत आणि निष्ठे सोबत व्यक्तिगत स्वार्थापोटी कधी गद्दारी केली नाही.येणाऱ्या पंचायत समिती निवडणुकीमध्ये उभे राहून यशस्वी होण्यासाठीच प्रामाणिक लढा उभा करायचा असा निर्धार अन निश्चय त्यांनी केला आहे. त्यांच्या या जीवन कार्याची दखल घेऊन, त्यांनी स्वीकारलेले आव्हानात्मक वेगळेपण लक्षात घेऊन पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने येणाऱ्या ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार हा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात येणार आहे. असे आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी जाहीर केले आहे. अनिता वाघमारे यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जगावेगळे वेगळेपण जपणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी संपर्क करावा - शेख आयेशा

ज्या महिलांनी शून्यातून विश्व निर्माण करत आपले अस्तित्व उभा केले आहे. अशा यशस्वी महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असणाऱ्या मुलींनी, महिलांनी आपल्या कार्य अहवालासह तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ यानंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी केले आहे.

## इस्लापूर ग्रामपंचायत लिपिक

ची सर्व पदाधिकारी आज घडीला भूमिगत झाल्याची चित्र सुद्धा पहावयास मिळत आहे. ताळमेळ लागत नसल्याने उपोषणकर्त्यांना भेट देण्यासाठी वेळ मिळत नाही ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. त्यातच विस्तार अधिकारी कांबळे यांनी उपोषणार्थिस तिसऱ्या दिवशी सायंकाळी साडेसहा वाजता भेट दिली. व सदरील प्रकरण उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात सुनावणी झाल्याने आम्हाला कुठलाही निकाल देता येत नाही तेव्हा तुम्ही अशाच पद्धतीने उपोषण सोडा अशी अकलेची तारे उडवून उपोषण ठिकाणाहून कुठलीही ठोस पावली न उचलता पळ काढणाऱ्या जीवन कांबळे या विस्तार अधिकाऱ्याकडे नांदेड जिल्ह्याच्या कर्तबगार सीईओ मिनल करनवाल यांनी दिनांक १५ ऑगस्ट रोजी झालेल्या लिपिक पदाच्या परीक्षेच्या निकालाची निकाल पत्र देऊन संबंधित उपोषणार्थीची मागणी पूर्ण करावी.व लक्ष वेधावे अशी मागणी या निमित्ताने पुढे येत आहे. त्यातच नांदेड जिल्ह्याची जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाकडे जातीने लक्ष वेधावे अशी मागणी या निमित्ताने पुढे येत आहे.

पान १ वरून

## वाळू माफीयांना

कारवाईचे आदेश दिले होते. पण तरीही वाळूसह वाहन ताब्यात न घेता फक्त वाहन ठाण्यात आणून लावले. तसेच गुन्हा दाखल करण्यासही विलंब केला. ही गोष्टी गुन्हेगारांना मदत करण्यासारखी आहे. यावर आता पोलीस अधिक्षकांनी मोठी कारवाई केली आहे.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे बीड पोलीस पुन्हा चर्चेत आले आहेत. वाल्मीक कराड याने आतापर्यंत बीड जिल्ह्यात आपल्या मर्जीतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या परळीत बदल्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्याने पोलिसांवर दबाव आणून अनेकांवर गुन्हा दाखल केल्याचाही आरोप सुरू आहे.

## धनंजय मुंडेंची टोळी

समाज घडवणारे ते नामदेव शास्त्री आहेत. त्यांच्याकडे जाणाऱ्यानेच त्यांना शिकवलं असेल.

समाज कुठलाही असो, एवढी विकृत घटना कुणीही पाठीशी घालणार नाही. फक्त धनंजय मुंडेंची टोळी सोडली, तर इतर कुणीही समर्थन करणार नाही. वंजारी समाजाला या गोष्टी मान्य नाहीत. अशा लोकांना समाज पाठीशी घालणार नाही. महंत सुद्धा त्यांना पाठीशी घालणार नाही, असा विश्वास जरांगेंनी व्यक्त केला.वारकरी संप्रदाय बदनाम होत असल्याच्या नामदेव शास्त्रींच्या विधानावर जरांगे म्हणाले, गुंड थोडी वारकरी संप्रदाय चालवतात. गुंडाचे सहकार्य घेऊन वारकरी संप्रदाय थोडी चालतो. मला शंका येतेय की, जे गेलेत त्यांनीच शिकवलं. कारण नामदेव शास्त्री असं बोलतील यावर विश्वास नाही, अशी भूमिका जरांगेंनी मांडली.

## माझ्यावर आलेलं

माझ्यावर आणि एका समाजावर टार्गेट करून फायदा घ्यायचा हा ज्याचा त्याचा विचार आहे. पण माझं थेट म्हणणं आहे की, जो कोणी आरोपी आहे, त्याला फासावर लटकवलं पाहिजे, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

मी भगवान गडावर काल (३० जानेवारी) आलो होतो. माझं काल रात्री चांगलं दर्शन झालं. आजही पुजा करत दर्शन घेतलं. आज (३१ जानेवारी) मी मुंबईच्या दिशेनं रवाना होणार आहे. भगवान गड माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याच्या पाठिशी उभा आहे. या गडासारखी शक्ती आणि ताकद त्यात बाबा नामदेवशास्त्री यांचा विश्वास मला मिळणं म्हणजे फार मोठी जबाबदारी आहे. कारण भगवानगड हा प्रत्येक गरीबाच्या एक-एक रुपयातून मोठा झाला आहे. म्हणूनच संतश्रेष्ठ भगवान बाबांना ऐश्वर्य संपन्न म्हटलं जातं. अशात हा भगवानगड संघर्षाच्या काळात माझ्या पाठीमागे उभा आहे, ही माझ्यासाठी खूप मोठी शक्ती आहे. तसेच, या शक्तीचं वर्णन मी इथे सांगू शकत नाही, असेही धनंजय मुंडे यावेळी म्हणाले.

## आ.संदीप क्षीरसागरांकडून

विभागाला द्यायची आणि त्यांच्याकडून आपणास हवा असणारा विद्युत पुरवठा घ्यायचा. तसेच ३६ कोटी रुपये थकबाकी भरण्यास मा. उपमुख्यमंत्री महोदयांनी तत्वतः मंजूरी दिली आहे. त्याबाबत मा.दादांचे आभार व्यक्त केले.- बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतःळ्याची उंची वाढवणे याबाबतीत तात्काळ पुढील कार्यवाही बाबत संबंधितास आदेशीत व्हावे.- अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृह मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असून बीड शहरात उपलब्ध असलेल्या शासकीय आवारामध्ये सहन जागा उपलब्ध करून देणे.- जिल्हा नियोजन अंतर्गत बीड नगर परिषदेला नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध व्हावा.- बीड नगर परिषद हद्दीतील सिटी सर्व्हे नं.७४५४ मधील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दु घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण व तसेच सुभाष रोड येथील जनावरांचा दवाखानाची जागा नगर परिषद, बीडला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन बाबत संबंधितास आदेश व्हावे असे झाल्या नगर परिषद, बीडच्या स्वउत्पन्नामध्ये वाढ होईल.- बीड येथील जनावरांचा दवाखाना, सुभाष रोड येथील जागा नगर परिषद, बीड ला हस्तांतरण करणेसाठी बैठकीचे आयोजन करणे.- बीड नगर परिषद हद्दीतील जुने तहसील कार्यालय जागेत दुकान केंद्रासाठी व उर्दू घरासाठी बीड नगर परिषदेकडे हस्तांतरण करणेबाबत- सन २०२० चा रखडलेला पीक विमा राज्य तक्रार समितीने डिसेंबर २०२२ मध्ये बीड,वडवणी,गेवराई तालुक्यातील शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्याचे सांगितले होते. मात्र एक वर्ष उलटले तरी अद्याप तरी अंमलबजावणी झाली नाही.- महाडीबीटी अंतर्गत लाभार्थी असलेल्या विविध योजनेतील लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही. या बाबत विभागाकडून निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले आहे.- श्री क्षेत्र कपिलधार १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजुर असून त्यास मान्यता देण्यात यावी. - शिवणी ता.बीड येथील महाविहार धम्मभुमी बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण केंद्रास 'क' दर्जा तीर्थक्षेत्र दर्जा देण्यात यावा.- श्री क्षेत्र उजव्या सोंडीचा गणपती मंदिर देवस्थान मन्यारवाडी, श्री क्षेत्र बेलखंडेश्वर महादेव संस्थान बेलखंडी पाटोदा ता.जि.बीड या तिर्थक्षेत्रास 'क' दर्जा प्राप्त करण्यात यावा.- खंडेश्वरी मंदिरासमोरील तालुका क्रीडा संकुलासाठी आपल्या विभागाकडून ५ कोटी रूपयांच्या विविध क्रीडा सुविधा निर्मितीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी १ कोटी रूपयांच्या निधी प्राप्त असून उर्वरित ४ कोटी रूपयांच्या विकास कामांचा आराखडा सादर केलेला असून त्या निधी उपलब्ध होणे बाबत.- बीड जिल्हा संकुलाची निर्मिती व सर्व क्रीडा सुविधांचे काम २५ वर्षापुर्वी झालेले आहे. सदर क्रीडा संकुलासाठी ८ कोटी रूपयांची तरतुद झालेली आहे. संकुलाची इमारत दुरूस्तीचे व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीचे काम करणे गरजेचे असून नवीन क्रीडा संकुलाच्या निर्मितीप्रमाणे संकुल व क्रीडा सुविधांच्या दुरूस्तीसाठी विशेष बाब अंतर्गत १७ कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी.- बोरफडी, मौज, जेबापिंप्री दगडी शहाजानपुर, मन्यारवाडी, मांजरसुंबा ता.बीड येथील उपकेंद्र इमारत बांधकामास निधी उपलब्ध करून देण्यात यावा.- बीड शहरातील अंकुशनगर उपकेंद्रावरून अर्ध्यापेक्षा जास्त बीड शहराला वीज पुरवठा आहे. सर्व सरकारी कार्यालय व वाढीव वस्त्या सदर उपकेंद्रावर असून ओव्हरलोड होत असून नवीन अतिरिक्त उपकेंद्र पोलीस कॉलनी येथे झाल्यास सोयीस्कर होईल व लाईटची अडचण मार्गी लागेल.- बीड जिल्हा वसुलीमध्ये एक नंबर असून शहरातील दुरुस्तीच्या कामांना निधी उपलब्ध व्हावा.- डीपीडीसीमध्ये बीड तालुक्यातील एकही प्रस्ताव मंजुर झालेला नाही.- ऋगावठाण अंतर्गत वस्ती येथील डी.पी.देणे बाबत नियम व अटी शिथील करण्यात यावे.- बीड शहर अंतर्गत जुने पोल बदलणे व केबलद्वारे काम करणेसाठी आदेशीत व्हावे. - पाली येथील ३३ के.व्ही.चे काम सुरू करणे बाबत आदेशीत व्हावे.- निवारणबीड व शिरूर का.तालुक्यातील कृषी व सिंगल फेज डी.पी.देण्यात यावे. - ताडसोन्ना, लिंबारुई, चर्हाटा, आहेरधानोर, बोरखेड, मोरगाव ता.बीड येथे वीजवितरण उपकेंद्र करण्यासाठी मंजुरीसह देण्यात यावा.- बीड व शिरूर कासार तालुक्यात शाळा खोली बांधकाम, दुरूस्ती आणि कंपाऊंड वॉल बांधकाम करणे.- बीड १ व २ ,बीड नागरी,शिरूर कासार येथील प्रकल्पातील व प्रकल्पांतर्गत अंगणवाडीतील रिक्तपदे भरणे.- युवा शांतीवन पाली येथील उर्वरित कामे करणेसाठी निधी उपलब्ध करण्यात यावा.- देवराई येथील आराखडा तयार करून कामे करणेसाठी निधी उपलब्ध होणे बाबत.- शिरूर तालुक्यातील हिवरसिंगा, जवळागिरी, बरगवाडी या गावातील वाहतुकीसाठी रेल्वे ब्रिज नसल्यामुळे गावात नागरिकांना ये-जा करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. याबाबत रेल्वे विभागाकडे प्रस्ताव सादर करून या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी विनंती केली.

## पुण्यात का वाढताय

न्यूरोलॉजी डॉक्टर निखिल जाधव यांनी बिझनेस स्टँडर्डला सांगितले की, भारतात जीबीएस प्रकरणे फक्त शरद ऋतूमध्येच दिसतात. या काळात रुग्णांची संख्या वाढते. कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी संसर्गामुळे जीबीएसचा प्रादुर्भाव पहिल्यांदा चीनमध्ये दिसून आला. पुण्यातील सध्याच्या उद्रेकाचे प्रमुख कारण मोठ्या लोकसंख्येसाठी दूषित पाण्याचे स्त्रोत असू शकते. डॉक्टरांकडून त्वरित उपचार घेतल्यास हे रुग्ण बरे होतात. लक्षणे दिसू लागल्यानंतर ५ ते ७ दिवसांत उपचार सुरू करणारे रुग्ण नंतर निरोगी होतात. सध्याच्या उद्रेकाचे आणखी एक कारण म्यूटेंट वेरियंट असू शकतो.

नागपुरात रुग्ण वाढले

पुण्यानंतर राज्यातील इतर भागातही रुग्ण वाढत आहे. नागपुरातही जीबीएसचे रुग्ण वाढत आहेत. रुग्णसंख्या आठवर पोहोचली आहे. शहरातील एका खासगी रुग्णालयात जीबीएसच्या आणखी एका रुग्णांची नोंद झाली आहे. जीबीएसच्या ५६ वर्षीय रुग्णाने केअर रुग्णालयात उपचार घेतले होते. बरे वाटल्यानंतर त्याला सुट्टी दिली गेली. नागपूर जिल्ह्यात सध्या पाच जीबीएस रुग्ण दाखल आहेत. २०२४ मध्ये नागपूरात ५६ रुग्ण आणि तीन मृत्यू झाला.

सांगलीत सहा रुग्ण, नाशिकमध्ये आरोग्य यंत्रणा सतर्क

जीबीएस आजाराच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिकेचा वैद्यकीय विभाग सतर्क झाला आहे. महापालिकेच्या दोन रुग्णालयात विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली. सांगलीत गुइलेन बॅरी सिंड्रोम रुग्णांची संख्या सहावर गेली आहे. सांगली शहरात एक तर ग्रामीण भागात पाच असे सहा गुइलेन बॅरी सिंड्रोमचे (जीबीएस) रूग्ण आढळून आले आहेत. यामध्ये आष्टा (ता.वाळवा), विटा (खानापूर) व नेलकरंजी (आटपाडी) येथील रूग्ण आहेत. या रूग्णांवर सांगली शहरातील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

## वक्फ विधेयकामधील

युजर' ची तरतूद हजरत पैगंबर मोहंमद यांच्या काळापासून आहे आणि ती काढून टाकणे मुस्लिम समुदायाच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होईल. पाल यांनी दावा केला की, समितीने मंजूर केलेल्या अनेक बदलांनी विरोधी सदस्यांच्या चिंतांनादेखील उत्तर दिले आहे. विधेयक लागू झाल्यानंतर वक्फ बोर्ड आपल्या जबाबदाऱ्या पारदर्शक आणि अधिक प्रभावीपणे पार पाडू शकेल, असे पाल म्हणाले. ८ ऑगस्ट २०२४ रोजी समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीच्या एकूण ३८ बैठका झाल्या. त्यासंबंधित लोकांशी चर्चा करण्यासाठी अनेक राज्यांच्या राजधान्यांचा दौरादेखील केला.

## भगवानगडासारख्या

या आरोपांच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन संत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेतले, तसेच गडाचे महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी चर्चा केली. यानंतर भगवान गड मंत्री धनंजय मुंडे यांच्या पाठीशी भक्कमपणे आहे, असे नामदेव शास्त्री यांनी जाहीर केले आहे. दरम्यान त्यांच्या या विधानानंतर राजकीय क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळत आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे. यावेळी आव्हाडांनी डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचे समर्थन करणे आत्यांत दुर्दैवी आहे, अशी भावना व्यक्त केली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या पोस्टमध्ये विविध आरोप करत काही लोकांची यादी देखील दिली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले की, डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी आज धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे समर्थन करणे अत्यंत दुर्दैवी आहे. भगवान गडासारख्या पवित्र ठिकाणावरून अशा गुन्हेगारी वृत्तीचे समर्थन आणि पाठराखण होणे, ही समाजासाठी अत्यंत घातक गोष्ट आहे. कधीकाळी आपण भगवानगड राजकारण्यापासून मुक्त करण्याची शपथ घेतली होती? आणि आज निष्पाप लोकांचे बळी घेणार्या लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्याचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्या धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीचे समर्थन करताय ही मनाला न पटणारी गोष्ट आहे. शास्त्री महाराज आपल्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे, पण आपण धनंजय मुंडे वाल्मिक कराड टोळीची पाठराखण करणे हे भगवान बाबांच्या विचारांना तिलांजली देण्यासारखे आहे. धनंजय मुंडे वाल्मिक कराड यांच्या गुन्हेगारी आणि राक्षसी राजकीय महत्वकांक्षेसाठी उध्वस्त केलेल्या समाजातील लोकांची यादी देतोय, त्या सर्वांना आणि धनंजय मुंडे वाल्मीक कराड यांना भगवान गडावर समाजाची परीषद बोलावून समोरासमोर बसून चर्चा घडवून आणा, म्हणजे धनंजय मुंडे वाल्मिक कराड हे किती मोठे संत आहेत हे संपूर्ण जगाला कळेल.